# सवयीचा गुण

डोक्यावर टोपी घातली की काही काळ ती जाणवते. पण दिवसभर ती डोक्यावरच राहिली तर तिचं जाणवणं नाहीसं होतं. ती काढल्यावर तिचा चक्क अभाव जाणवतो! बाहेरून येणाऱ्या पाहुण्याला घरातल्या अत्तराचा भपकारा वाटतो. पण काही काळाने तो वास घरातल्या उत्सवी वातावरणाचा भाग म्हणून स्वीकारला जातो. मंद पार्श्वसंगीताने गप्पांमध्ये व्यत्यय येईल अशी कुरकूर करणाऱ्यांना सरावाने ते संगीत ऐकूही येईनासं होतं. पण त्या सुरावटीने गप्पांची लज्जत मात्र वाढते.

तीव्र वेदना खेरीज करता इतर कुठल्याही नव्या गोष्टीची सवय झाली की ती इतकी अंगवळणी पडते की तिची जाणीवच होईनाशी होते.

नव्या माणसाची सवय करून घेणं मात्र याहून वेगळं असतं. स्पर्श, वास, संगीत वगैरेंना स्वतःच्या प्रतिक्रिया नसतात. माणसांच्या त्यांच्याबद्दलच्या एकतर्फी प्रतिक्रिया सरावाने घटल्या की त्या गोष्टी धरून चालता येतात. पण नव्या माणसासोबत मात्र त्याचंही मन, त्याच्याही प्रतिक्रिया येतात. त्यांची सतत आवर्जून दखल घ्यावी लागते.

भरल्या घरात, एकत्र कुटुंबात अशा प्रतिक्रियांचा, भावनांचा, व्यक्तिमत्त्वांचा गोफ विणला जातो.

गोफ विणण्याचा एक पारंपरिक नाच असतो. त्याच्यात छतातल्या आकड्यातून अनेक वेगवेगळ्या रंगाचे दोर सोडलेले असतात. प्रत्येक नर्तक एकाच दोराचं खालचं टोक हातात धरतो. नाचता-नाचताच सगळे दोर एकमेकांत गुंफले जातात; बहुरंगी गोफ विणला जातो. प्रत्येकाच्या नाचाच्या स्टेप्स ठरलेल्या असतात. त्यांच्यात जराशीही चूक झाली तर गोफाचं सारं तंत्रच बिनसतं.

जेव्हा नवी सून घरात येते तेव्हा ती सोबत तिचं मन, तिच्या भावना, कौटुंबिक गोफासाठी तिच्या नव्या रंगाचा दोर घेऊन येते. तिथून पुढे कुटुंबाचा गोफ बिनचूक

विणण्यासाठी सुनेला तर तिच्या स्टेप्स शिकाव्या लागतातच पण घरातल्या प्रत्येकाला आपापल्या स्टेप्स थोड्याफार प्रमाणात बदलाव्या लागतात. तेवढं देवाणघेवाणीचं पथ्य पाळलं की नव्या रंगासकट अधिक सुंदर गोफ गुंफता येतो; तो नवा दोर त्या गोफाचा, त्या नाचाचा अविभाज्य भाग बनतो.

नव्या सवंगड्याशी जमवून घेताना नाचात काय, खेळात काय किंवा आयुष्यात काय, संघातल्या सगळ्याच भिडूंना सुरुवातीला नवेपणा जाणवतो, कधीकधी जाचतोही. नवेपणाचे बोचरे कंगोरे तेढीने जपले तर ते अधिकच तीक्ष्ण, अधिकाधिक दुःखद होत जातात. आणि दुःखाचा सल कधीच सरत नाही.

ते दुःख टाळण्यासाठी सुरुवातीपासूनच एकमेकांचा मनापासून स्वीकार करायला हवा. आयुष्याच्या खेळाचा तो सर्वात महत्त्वाचा नियम आहे. मनं जुळली की कसलेही अणकुचीदार कंगोरे एकदिलाने घासता येतात. नवे-जुने भिडू एकमेकांच्या मनासारखे घडवले जातात. खेळाला नव्या भिडूचा आणि नवागताला खेळाचा सराव होतो; नवेपणाची, परकेपणाची जाणीवच नाहीशी होते.

होता-होता भिडू नुसता जिव-लग नव्हे तर स्वतःच्या हातापायांइतका आपल्या अस्तित्वाचाच हिस्सा बनतो. जन्मभराचा डाव मस्त रंगतो; रंगतच जातो.

डॉ. उज्ज्वला दळवी

-ujjwalahd9@gmail.com

(पूर्वप्रसिध्दी : 'मुंबई सकाळ')